NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०४.११.२०२६ बुधवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०३.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून एकुण २,८०,९७०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये १४ केसेसमध्ये २० ईसमांवर कारवाई करून एकुण १,१८,२३०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे, दिनांक ०३.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०४.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २७ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ५१ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये १२९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २५६ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ९४ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ५१ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १३९ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १७ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १२ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०५२ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये १५ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २३ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०५४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,४२,८५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :– एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.

दिनांक ०३.११.२०२६ चे २१.१५ वा. ते २३.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना साखळे गुरूजी शाळेचे मागील सार्वजनिक रोडवर एक ॲक्टीवा मोपेड व एक रेनॉल्ट कार जवळ दोन इसम संशयीतरित्या काहीतरी देवाण–घेवाण करतांना दिसुन आले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले व पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव १) शेख फैजान शेख

अस्लम, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ३५, हरपुन नगर, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर २) मोहीद अहमद अब्दुल अनिस, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. २०२, टिचर्स कॉलोनी, ठाकुर प्लॉट, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर असे सांगीतले. त्यांचेजवळील वाहनांची व त्यांची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण ७.११० ग्राम वजनी एम.डी. पावडर मिळून आली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी नमुद एमडी पावडर ही त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी नामे १) अमन इंगळे, २) संदीप कश्यप, दोन्हीही रा. रामबाग, मैत्री बुध्द विहार जवळ, नागपुर यांचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०३ मोबाईल व ॲक्टीवा मोपेड तसेच रेनॉल्ट कार असा एकुण ७,२६,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे गणेशपेठ येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करून, त्यांना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव गणेशपेठ पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. भारत क्षिरसागर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ पोलीसांची कामगीरी :— स्क्रॅप करण्यात आलेले असुरक्षित जेसिबी क्रेन बेकायदेशिररित्या वापरून शासनाची फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०३.११.२०२६ चे १४.०० वा. ते १६.२० वा. चे गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, बाहेर राज्यातुन स्क्रॅप करण्यात आलेले जेसिबी वाहनास एकच नोंदणी क्रमांक वापरून, नियमबाहयरित्या स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता वापरले जात आहे. अशा खात्रिशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत शोध घेवुन, प्लॉट नं. २०४, माऊंट लिटेरा शाळेजवळ प्राप्त वर्णनाचे तिन जेसिबी मिळुन आली. पंचासमक्ष जेसिबी चालकांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी आपली नावे १) फिरोज आलम वल्द अजगर हुसैन, वय २६ वर्षे, २) अजगर हुसैन, वय ५६ वर्षे, दोन्हीही रा. यशोधरानगर, एन,आय.टी क्वॉर्टर नं २३/६, यशोधरानगर, नागपुर असे सांगीतले. त्यांचे ताब्यातील जेसिबी चे कागदपत्राची पाहणी केली असता, नमुद जेसिबी बाहेर राज्यातुन असुरक्षित करण्यात आले असल्याचे, तसेच एकच नोंदणी क्रमांकाचा वापर करून, हस्तांतरण नियमांचे उल्लंघन करून,

रजीस्ट्रेशन क्रमांकाची बनावटीकरण करून, नमुद वाहने वैध असल्याचे भासवुन, बेकायदेशिरीत्या स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता वापरून शासनाची दिशाभुल व फसवणुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन इंडो फार्म कंपनीची हायड्रो क्रेन, ॲक्शन कन्स्ट्रक्शन कंपनीची हायड्रो क्रेन व स्टॅण्डर्ड कंपनीची हायड्रो क्रेन असे एकुण ०३ जेसिबी क्रेन किंमती २०,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखडे, पोउपनि. मनोज राऊत, पोहवा. कमलेश गणेर, पोहवा. अर्जुन यादव, पोअं. संदीप पांडे, आशिष धंदरे, विवेक श्रीपाद यांनी केली.



<u>४) गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.</u>

फिर्यादी संदीप भास्करराव राशतवार, वय ६० वर्षे, रा. फ्लॅट नं. २, ऋषभ पॅराडाईज्ड, कृषीनारा सोसायटी, मनिष नगर, बेलतरोडी, नागपुर यांनी त्यांची बजाज प्लॅटीना दुचाकी क्र. एम.एच ४० ए.एच १७२५ किंमती १०,०००/—रू. ची दिनांक १३.०५.२०२६ चे १४.०० ते १४.३० वा. चे दरम्यान पोलीस ठाणे तहसिल हद्दीत गांधीबाग, दवाई बाजार, एम.बि. फार्मा दुकानासमोर लॉक करून, पार्क करून दवाई घेण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व खात्रीशिर माहीती प्राप्त करून, गुन्ह्यातील आरोपी भुषण कृष्णाजी घागरे, वय ३४ वर्षे, रा. साईनगर ढाब्याजवळ, वाडी, नागपुर यास ताब्यात घेतले. त्यास गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले बजाज प्लॅटीना दुचाकी क्र. एम.एच ४० ए.एच १७२५ किंमती १०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव तहसिल पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



(गुन्हे)

<u>पोलीस ठाणे बेलतरोडी :– हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.</u>

दिनांक ०३.११.२०२६ चे १८.१५ चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खापरी पुनर्वसन पशुवैद्यकीय दवाखान्यासमोर एक इसम संशयीतरित्या दिसुन त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले व पळण्याचे कारण विचारले असता, त्याने उडवा–उडवीची उत्तरे दिली. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नाहीद सुभान खान, वय ३२ वर्षे रा. खापरी पुनर्वसन सेक्टर नं. ३६, यश किराणा दुकानजवळ, वर्धा रोड, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एक धारदार लोखंडी चाकु मिळून आल्याने जप्त करण्यात आला. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. १२/२०२६ दिनांक २२.०८.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. सुहास शिंगणे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. ऋषीकेश कडु यांनी आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का. सहकलम ४,२५ भा.ह. का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

<u>पोलीस ठाणे हिंगणा</u> :– दिनांक ०३.११.२०२६ चे ११.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, देवळी (पेंढरी) गावाजवळील कृष्णा नदीचे पात्रातील खडकाजवळ एक अनोळखी महीला वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाच्या ज्यांचे पायात पैजण व बोटात जोडवे घातलेले असुन, त्यांचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत मिळुन आले. पोलीसांनी फॉरेन्सीक टीमचे सहाय्याने पाण्याबाहेर काढुन उत्तरीय तपासणीकरीता एम्स हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोलीस पाटील श्री. संदीप रामकृष्णाजी मोदनकर, वय ४० वर्षे, रा. देवळी (पेंढरी), तह. हिंगणा, जि. नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे मपोउपनि. चंचल पवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे अजनी :– फिर्यादी हनुमान गोमाजी बेताल, वय ५४ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५०, वसंत नगर, गल्ली नं.७, देवासे किराणा जवळ, अजनी, नागपूर यांनी पोलीस ठाण अजनी येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. मनस्वी हनुमान बेताल, वय १७ वर्षे ही दिनांक २५.०५.२०२६ चे १५.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील आपले राहते घरून बेपत्ता झाली आहे. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट १ इंच, केस–काळे लांब, अंगात– पांढऱ्या रंगाचा टॉप ज्यावर काळे रंगाचे ठिपके व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.